गायकवाड यांच्यावरील हल्ल्याप्रकरणी उद्या अक्कलकोट बंदची हाक

✔ अक्कलकोट/प्रतिनिधी

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोटमध्ये झालेला जीवघेणा हल्ला हा पुरोगामी विचारांवर झालेला प्रतिगामी हल्ला असून, बहुजन समाज आणि सकल मराठा समाज हा हल्ला कदापिही खपवून घेणार नाही. या घटनेच्या निषेधार्थ येत्या शुक्रवार दि. १८ जुलै रोजी अक्कलकोट बंदची हाक देण्यात आली असून हा बंद दुपारी २ वाजेपर्यंत कडकडीत राहणार आहे. या बंदमध्ये सोलापूर जिल्हा तसेच शहरातील बहुजन चळवळीतील सर्व संघटना आणि नेते मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार यांनी दिली.

गेल्या रविवारी अक्कलकोट येथे प्रवीण गायकवाड यांच्यावर शाई फेकून हल्ला करण्यात आला. या प्रकाराचा निषेध करण्यासाठी बुधवारी श्री फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या सभागृहात तातडीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी माऊली पवार बोलत होते.

अक्कलकोट : बैठकीत बोलताना सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार. यावेळी मराठा समाजाचे नेते व कार्यकर्ते.

ते पुढे म्हणाले, हा केवळ एका व्यक्तीवरचा नव्हे तर संपूर्ण पुरोगामी चळवळीवरचा हल्ला आहे. या हल्ल्याची नोंद संपूर्ण महाराष्ट्राने घ्यावी, अशा पद्धतीने अक्कलकोट बंदचे नियोजन करण्यात येत आहे.

सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार यांची माहिती

या बैठकीस सोलापूरमधील मराठा समाजाचे नेते पुरुषोत्तम बरडे, नाना काळे, राजन जाधव, राम गायकवाड यांच्यासह विविध संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बंदमध्ये शाळा, महाविद्यालये, दुकाने व अन्य व्यवहार बंद राहणार असून, केवळ दवाखाने आणि मेडिकलसारख्या अत्यावश्यक सेवा सुरू ठेवण्यात येणार आहेत. बाहेरून येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये आणि स्थानिक जनतेला अडचण होऊ नये म्हणून बंद फक्त दुपारी २ वाजेपर्यंत असला तरी तो पूर्णतः कडकडीत असेल, असेही पवार यांनी स्पष्ट केले.

यावेळी बोलताना मराठा सेवा संघाचे राम गायकवाड म्हणाले, मुळात हा कार्यक्रम फत्तेसिंह शिक्षण संस्था आणि सकल मराठा समाज यांच्यावतीने आयोजित करण्यात आला असताना काहीजण विनाकारण अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले आणि अमोलराजे भोसले यांची बदनामी करत आहेत. हे एक नियोजित षडयंत्र असून, आम्ही हे सहन करणार नाही. या षडयंत्रामागे नेमके कोण आहे, हे शोधून काढले जाईल. बाबा निंबाळकर यांनीही या प्रकरणात नाहक भोसले कुटुंबीयांची बदनामी केली जात असल्याचा ठपका ठेवत या कारस्थानाविरुद्ध निश्चित आवाज उठवला जाईल. हा बंद फक्त गायकवाड यांच्यावरच्या हल्ल्याचा नव्हे, तर या बदनामीचा निषेध म्हणूनही आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

सकल मराठा समाज बहुजन चळवळ आणि श्री फत्तेसिंह शिक्षण संस्था यांच्यावतीने या बंदचे आयोजन करण्यात आले आहे. या बंदला काही जणांनी तत्काळ पाठिंबा दर्शवला आहे. सर्वांनी पाठिंबा घोषित करावा, असे आवाहन फत्तेसिंह शिक्षण संस्थेच्या संचालक बाळासाहेब मोरे यांनी केले.

दरम्यान या अक्कलकोट बंदला सर्व स्तरातून जाहीर पाठिंबा मिळत असून काँग्रेस नेते अशपाक बळोरगी, मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी एजाज मुतवल्ली आणि शाकीर पटेल यांनी पाठिंबा दर्शविला आहे. यावेळी अरुण जाधव, अतुल जाधव, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष मल्लिनाथ साखरे, ॲड. सुरेशचंद्र सूर्यवंशी, मनोज निकम, अमर शिंदे, अभय खोबरे, शाम मोरे, लाला राठोड, दयानंद काजळे, तम्मा शेळके, प्रवीण घाडगे, शितल फुटाणे, वसंत देडे, वरूण शेळके, प्रवीण देशमुख, प्रसन्न हत्ते यांच्यासह अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बदनामीचे षडयंत्र

योद्धा शरण जात नाही म्हटल्यावर बदनामी केली जाते अशा शब्दांत कार्यकर्त्यांनी आपली भावना व्यक्त केली. जेव्हा एखादा लढवय्या झुकत नाही, तेव्हा त्याला बदनाम करण्याचे डाव रचले जातात. आज जनमेजयराजे भोसले आणि अमोलराजे भोसले यांच्यावर अशाच प्रकारचे षडयंत्र सुरू आहे. मात्र या प्रकरणाची खरी माहिती प्रवीण गायकवाड यांना देण्यात आलेली आहे त्यावर पडदा देखील पडलेला आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

ज्या चौकात हल्ला केला, त्याच चौकात सन्मान करू

गायकवाड यांच्यावर ज्या चौकात हल्ला झाला, त्याच चौकात त्यांचा भव्य नागरी सत्कार करून विचारांचा विजय साजरा केला जाईल, असेही माऊली पवार यांनी ठामपणे जाहीर केले. विचारांची लढाई ही विचारांनीच लढली पाहिजे, असा संदेश देत त्यांनी हा हल्ला संपूर्ण बहुजन चळवळीवर आहे, असे सांगत एकतेचा निर्धार व्यक्त केला.

संक्षिप्त वृत्त

अकलूज : उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर यांना निवेदन देताना सकल मराठा समाज, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते

गायकवाड यांच्यावर हल्ला; आरोपींवर कारवाईची मागणी

✔ **अकलूज :** संभाजी संभाजी ब्रिगेडचे नेते प्रविण गायकवाड यांच्यावरती अक्कलकोट या ठिकाणी भाजप युवा मोर्चाचे प्रदेश सचिव दीपक काटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी जो हल्ला घडवून आणला याच्या निषेधार्थ माळशिरस तालुका सर्व पुरोगामी संघटना विविध पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी निषेध व्यक्त करून अकलूजचे उपविभागीय पोलिस अधिकारी नारायण शिरगावकर यांना आरोपींवर कठोर कारवाई व शिक्षा व्हावी यासाठी निवेदन दिले यावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, मराठा क्रांती ठोक मोर्चा चे राज्य समन्वयक धनाजी साखळकर, माळशिरस तालुक्याचे मराठा समन्वयक अण्णासाहेब शिंदे, सचिन गायकवाड, बबनराव शेंडगे, मराठा सेवा संघाचे माळशिरस तालुका अध्यक्ष निनाद पाटील ,संभाजी ब्रिगेड माळशिरस तालुका उपाध्यक्ष सचिन पराडे, विलास मगर आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थिती होते प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेला हल्ला हा पुरोगामी चळवळीवर झालेला हल्ला असून या हल्ल्याचा मुख्य सूत्रधार कोण आहे? त्या सूत्रधारापर्यंत पोलीस प्रशासनाने पोहोचून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, असे संभाजी ब्रिगेडचे माळशिरस तालुका उपाध्यक्ष सचिन पराडे यांनी म्हटले आहे.

सरकोली येथे मारहाण करून खिशातील पैसे लुटले

✔ **पंढरपूर :** तू बाहेरच्या गावातून आमच्या येथे जगायला आला आहेस. असे म्हणून दोघांनी काठीने मारहाण करीत खिशातील ५ हजार रुपये बळजबरीने काढून पोबारा केला . ही घटना सरकोली (ता.पंढरपूर) येथे सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी संदीप दिगंबर भोसले आणि ब्रह्मदेव पंडित जाधव (दोघे रा. सरकोली) यांच्याविरुद्ध मारहाण तसेच जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. कल्याण बाळासाहेब चव्हाण (वय ३५ रा.सरकोली) असे जखमीचे नाव आहे. ते सोमवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास गावातील चौकामध्ये चहा पिण्यासाठी निघाले होते. त्यावेळी वरील दोघांनी त्यांना हाक मारून बोलावून घेतले. आणि काठीने मारहाण करीत शर्ट फाडले. तसेच त्यांच्या खिशातील ५ हजार ४०० काढून घेऊन पोबारा केला. असे चव्हाण यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार देशमुख पुढील तपास करीत आहेत.

शेतातून विद्युत मोटारीसह लाखांचे साहित्य पळवले

✔ **सोलापूर :** शेतातील विहिरीवर बसवण्यासाठी आणलेली नवीन पाण्याचे मोटार आणि केबल असा एकूण ९९ हजार ६५० रुपयाचे साहित्य चोरट्याने पळवले. ही चोरी अकोलेकाटी तालुका (उत्तर सोलापूर) येथे मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडली. या संदर्भात प्रियांका देविदास लामकाने (रा. अकोलेकाटी) यांनी सोलापूर तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. त्या आपल्या शेतातील विहिरीवर बसवण्यासाठी क्रॉम्प्टन कंपनीची नवीन पाण्याची मोटर आणि कॉपर केबल आणून ठेवले होते. मंगळवारी पहाटेच्या सुमारास अनोळखी चोरट्याने मोटार आणि २०० मीटर कॉपर केबल पळवून नेली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार मिस्त्री पुढील तपास करीत आहेत.

बार्शी येथे घरफोडी; अडीच लाखांचे दागिने गायब

✔ **बार्शी :** बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने रोख रकमेसह २ लाख ५५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने पळविले. ही चोरी बार्शी येथील विठ्ठल नगरात मंगळवारी सकाळी घडल्याचे उघडकीस आले. या संदर्भात बापू केरबा परांडे (रा. विठ्ठलनगर) यांनी बार्शी शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. ते रविवारी दुपारच्या सुमारास घराला कुलूप लावून गेले होते. मंगळवारी सकाळी परतल्यानंतर त्यांना चोरी झाल्याचे दिसून आले. पहाटेच्या सुमारास चोट्याने बंद दरवाजाचे कुलूप कोंडयासहीत तोडून घरात प्रवेश केला.आणि बेडरूमधील पिशवीत ठेवलेली रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा ऐवज चोरून नेला.असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास हवालदार माने करीत आहेत.

थकीत कराबाबत थकबाकीदारांना नोटीसा द्या

आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे मिळकत करासंदर्भात केली पाहणी

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सलगरवस्ती, फ्री सेटलमेंट कॉलनीत मिळकतकर थकित ठेवणाऱ्यांना नोटीसा द्या, असे आदेश महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी बुधवारी दिले.आयुक्तांनी खाजगी आस्थापना, शाळा, दुकान, मेडिकल,दवाखाने यांची सखोल तपासणी करण्याचे आदेश दिले.

आयुक्तांनी सलगर वस्ती, फ्री सेटलमेंट कॉलनी या भागात थेट भेट देऊन मिळकत करसंदर्भात तपासणी केली. यावेळी त्यांनी परिसरातील नागरिक व व्यावसायिक मिळकतधारकांची भेट घेऊन मिळकत कर भरण्याचे आवाहन केले.तपासणी दरम्यान आयुक्तांना असे आढळून आले की, अनेक मिळकतधारकांनी कर भरणे टाळले असून महापालिकेचे महसूल थकवला आहे. त्यामुळे अशा नागरिकांना आणि आस्थापनांना तात्काळ नोटीस बजावून मिळकत कर भरण्यास निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले. आयुक्तांनी खाजगी आस्थापना, शाळा, दुकान, मेडिकल,दवाखाने यांची सखोल तपासणी करण्याचे आदेश दिले. महसूल वसुली वाढविण्यासाठी व नागरी सुविधा सुरळीतपणे पुरविण्यासाठी महापालिकेने मिळकत कर वसुलीला गती दिली असून नागरिकांनी वेळेवर कर भरून जबाबदार नागरिकत्वाचे पालन करावे, असे आवाहन आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी यावेळी केले. यावेळी उपायुक्त आशिष लोकरे यांच्यासह मालमत्ता विभागातील अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

सोलापूर : विविध भागात जाऊन मिळकत करसंदर्भात तपासणी करताना आयुक्त ओम्बासे.

... तर आस्थापना सील करण्याची कारवाई

ज्या ठिकाणी अधिकृत मंजुरीशिवाय वाढीव बांधकाम करण्यात आले आहे. अशा वाढीव बांधकामांवर कायदेशीर कार्यवाही करत त्यांना वाढीव मिळकत कर लावण्यात यावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.त्याचप्रमाणे ज्या खाजगी आस्थापनांनी अनेकवेळा सूचना मिळाल्यानंतरही मिळकतकर भरलेला नाही, अशांना अंतिम नोटीस पाठवून दिलेल्या मुदतीत कर न भरल्यास संबंधित आस्थापना सील करण्याची कारवाई हाती घेण्याच्या स्पष्ट सूचनादेखील त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

बसवेश्वर स्मारकासाठी कृष्ण तलावाच्या जागेवरच शिक्कामोर्तब

स्मारक कृती समिती अध्यक्षांच्या प्रयत्नाचे फलित

✔ सोलापूर/प्रतिनिधी

थोर समतावादी संत आणि लोकशाही संकल्पनेचे प्रणेते जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक मंगळवेढ्यात निर्मितीसाठी राज्य सरकारने हालचाली गतिमान केल्या आहेत.त्याचाच एक भाग म्हणून डॉ.बसवराज बगले यांच्या नेतृत्वाखालील स्मारक कृती समितीने मागणी केलेली कृष्ण तलावाची शासकीय जमीन वर्ग करण्याच्या निर्णयावर मंगळवारी शिक्कामोर्तब झाला. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मंगळवारी विधानभवनात तातडीची बैठक बोलावून या विषयी प्रशासनाला सूचना केल्या आहेत.

२०१६ साली शिवा संघटनेचे नेते प्रा.मनोहर धोंडे आणि तत्कालीन सोलापूर जिल्हाध्यक्ष डॉ.बसवराज बगले यांनी निवेदनाद्वारे या आंतरराष्ट्रीय स्मारकाची मागणी केली होती.त्याची दखल घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्मारक निर्मितीची घोषणा करून त्यासाठी शासकीय समिती गठीत केली होती.त्या समितीने कृषी विभागाच्या



जमिनीत कृषी पर्यटन केंद्र उभारून त्या अंतर्गत जागेत बसवेश्वरांचे स्मारक करण्याचा चुकीचा निर्णय घेतला होता. परंतु ती जागा उपलब्ध होणार नसल्याने कृष्ण तलाव परिसरात स्मारकासाठी स्वतंत्र जागेचा आग्रह धरण्यात आला होता. दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या शिफारसीनुसार बगले यांची शासकीय स्मारक समितीवर निवड झाल्यानंतर त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे शासकीय जमीन स्मारक समितीच्या नांवे हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव तयार करण्याची विनंती केली होती. त्यानुसार निवृत्त मंडल अधिकारी आणि समितीचे सदस्य तुकाराम कुदळे यांच्या मदतीने मंगळवेढ्याचे तहसीलदार आणि प्रांताधिकारी यांनी बसवेश्वर स्मारकासाठी कृष्ण तलावाचीच जागा योग्य असल्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविला होता.मात्र समिती एका महिन्यातच मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी रद्द केली. त्यामुळे स्मारकाच्या कार्याला ब्रेक लागला.

प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची सूचना

पुन्हा महात्मा बसवेश्वर स्मारक कृती समितीच्या वतीने अन्नत्याग आंदोलन करण्याचा इशारा दियानंतर पालकमंत्री जयकुमार गोरे आणि सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून या संदर्भातील हालचालींना गती आली आहे. १५ जुलै रोजी तातडीची बैठक घेऊन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याबाबत आढावा घेतला आणि स्मारक कृती समितीने सुचविलेली कृष्ण तलावाची शासकीय जमीन वर्ग करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची सूचना केली आहे.

आषाढी यात्रेसाठी रेल्वेला १ कोटी ६२ लाखांचे उत्पन्न

✔ पंढरपूर/प्रतिनिधी

आषाढी यात्रेत विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक येणार असल्याने रेल्वे प्रशासनाने जादा रेल्वे गाड्या सोडल्या होत्या यातून रेल्वेला १ कोटी ६२ लाख रुपयाचे उत्पन्न मिळाले आहे गेल्या वर्षीपेक्षा उत्पन्नामध्ये वाढ झाली असल्याचे दिसून आले आहे

यंदाच्या वर्षी आषाढी यात्रेसाठी वीस लाखाहून अधिक भाविक दाखल होणार असल्याचा अंदाज प्रशासनाने व्यक्त केला होता यामुळे येणाऱ्या भाविकांची सोय व्हावी यासाठी राज्य परिवहन महामंडळाने ५२०० ज्यादा बसेस सोडल्या होत्या तसेच बसेस थांबण्यासाठी चार बस स्थानके तयार करण्यात आली होती भाविकांना चांगल्या सुविधा दिल्या असल्यामुळे एसटीने लाखो भाविक पंढरपुरात दाखल झाले यातून एसटीला सुमारे पाच कोटी होऊन अधिक रुपयाचे उत्पन्न मिळाले तसेच रेल्वे प्रशासनाने भाविकांच्या सोयीसाठी जादा रेल्वे गाड्या सोडल्या होत्या यातून रेल्वेने २३९ फेऱ्या केल्या आहेत यामधून दोन लाख %६ भाविकांची ने आण करण्यात आली यामधून रेल्वेला एक कोटी ६२ लाख रुपयाचे उत्पन्न मिळाले आहे गेल्या वर्षीपेक्षा जादा यंदाच्या वर्षी उत्पन्न मिळाले आहे आषाढी यात्रेमध्ये एसटी व रेल्वे मालामाल झाले असल्याचे दिसून येत आहे एसटी व रेल्वेने भाविकांच्या सुविधेसाठी चांगले नियोजन केले असल्यामुळे भाविकातून समाधान व्यक्त होत आहे.

महाबळेश्वरमध्ये मुसळधार पाऊस

आंबेनळी घाटात दरडचे सत्र सुरू; लिंगमळा धबधबा पर्यटनासाठी बंद

✔ महाबळेश्वर/प्रतिनिधी

महाबळेश्वर तालुक्याला पावसाने झोडपून काढले आहे. सोमवारी दिवसभर व रात्री धुवाधार पाऊस कोसळला. मंगळवारी सकाळपासून पावसाची अधूनमधून बॅटिंग सुरू होती. संततधार पावसामुळे तालुक्यातील दुर्गम बिरमणी गावाकडे जाणाऱ्या पुलावर कोयना नदीचे पाणी आल्याने गावाचा संपर्क तुटला. अंबेनळी घाटात दरड कोसळण्याचे सत्र सुरूच आहे.

महाबळेश्वर-कोकणाला जोडणाऱ्या आंबेनळी घाट रस्त्यावर पोलादपूर हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात दरड कोसळून मलबा रस्त्यावर आला आहे, त्यामुळे आंबेनळी घाटामधून वाहतूक पुन्हा पूर्ववत सुरू होण्यास विलंब लागणार आहे. यामुळे महाबळेश्वर व पोलादपूर प्रशासनाने समन्वयाने हा घाटरस्त्यावरील वाहतूक बंद केली आहे. महाबळेश्वरच्या महाड नाका येथे बॅरिगेट्स

लावून पोलादपूरकडे जाणारी वाहतूक पूर्णपणे बंद केली आहे. याचा आढावा तहसीलदार सचिन मस्के यांनी मंगळवारी सकाळी घेतला. सोमवारी रात्रीपासून पाऊस जास्त प्रमाणात असल्यामुळे वनविभागामार्फत वेण्णा नदीवरील लिंगमळा धबधबा सध्या तात्पुरत्या स्वरूपात पर्यटनासाठी बंद ठेवण्यात आला असल्याची माहिती मिळाली. मंगळवारी दिवसभर पावसाची अधूनमधून बॅटिंग सुरू होती. आजअखेरपर्यंत महाबळेश्वर शहरात चोवीस तासांत १४७.८० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

मान्सूनच्या नव्या अंदाजामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली

२० जुलैच्या पुढे पावसाचा जोर वाढणार

✔ मुंबई/प्रतिनिधी

यंदा देशासह राज्यात मान्सून वेळेपूर्वीच दाखल झाला, महाराष्ट्रात मान्सून सामान्यपणे सात जूनच्या आसपास दाखल होतो, मात्र यंदा २५ मे रोजीच मान्सूननं महाराष्ट्रात एन्ट्री केली. राज्यात मान्सूनची एन्ट्री होताच मुसळधार पावसाला सुरुवात झाली, राज्यातील अनेक भागांमध्ये त्यावेळी जोरदार पाऊस झाला, मात्र तीस मे नंतर पावसात काहीसा खंड पडला. आता मान्सूनच्या नव्या अंदाजामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. २० जुलैच्या पुढे पावसाचा जोर वाढणार

असल्याचा अंदाज आहे.

दरम्यान त्यानंतर पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढल्यानं पेरण्यांच्या कामाला वेग आला. मात्र अजूनही अनेक भागांमध्ये पावसाचं प्रमाण असमान आहे. मराठवाड्यात अजूनही म्हणावा असा पाऊस पडला नसल्यानं शेतकऱ्यांमध्ये चिंतेच वातावरण निर्माण झालं आहे. आता शेतकऱ्यांच्या चिंतेत आणखी भर घालणारी एक बातमी समोर आली आहे. हवामान विभागाच्या नव्या अंदाजामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

मराठवाड्यात यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला आहे, सध्या तरी मराठवाड्यात पावसाचा जोर वाढण्यास अनुकूल वातावरण नाही, तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो, दोन-तीन दिवसांत पुणे शहर आणि शहरालगत मोठा पाऊस होणार नाही, मात्र २० तारखेच्या पुढे पावसाचा जोर वाढेल. असा अंदाज हवामान तज्ज्ञ एसडी सानप यांनी वर्तवला आहे.